

| वर्ष - 9 | अंक -13 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 29 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



## आतील पानांत

- पाटीदार दुलीप ट्रॉफीत चमकला!
- माझ्या निवृत्तीमुळे आयुष्य सुधारणार
- उत्तर प्रदेश, छत्तीसगडला पुराचा फटका
- विधेयके प्रलंबित ठेवता येणार नाहीत!


### जरांगेंच्या ओबीसीतून रक्षणाच्या मागणीला राष्ट्रीय ओबीसी महासंघांचा कडाडून विरोध

# आता ओबीसींचाही चलो मुंबईचा नारा!

## उपोषण करण्याची घोषणा, गरज पडल्यास मुंबईतही येणार असल्याचा इशारा



| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**मनोज जरांगे पाटलांविरोधात आता राष्ट्रीय ओबीसी महासंघ (RASHTRIYA OBC MAHASANGH) मैदानात उतरला आहे. ओबीसी महासंघानं जरांगे पाटील (MANOJ JARANGE PATIL) यांच्या मागण्यांना विरोध करत उपोषण करण्याची घोषणा केलीय. तसंच गरज पडल्यास मुंबईतही येणार असल्याचा इशारा ओबीसी महासंघाकडून देण्यात आला आहे.**

मनोज जरांगेंच्या ओबीसीतून आरक्षणाच्या मागणीला राष्ट्रीय ओबीसी महासंघानं कडाडून विरोध केलाय. मराठा समाजाला सरसकट ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी करत जरांगेंनी मुंबईकडे कूच केलीय. मात्र, जरांगेंच्या या मागणीविरोधात आता ओबीसी महासंघ देखील आक्रमक झालाय. जरांगेंच्या मागण्यांचा विचार केल्यास आम्ही देखील मुंबईत धडकणार असा थेट इशारा ओबीसी नेते बबनराव तायवाडे यांनी दिलाय. ओबीसी समाजाच्या मागण्यांसाठी नागपूरच्या संविधान चौकात आंदोलन करण्यात येणार आहे. जरांगे पाटलांप्रमाणे ओबीसी महासंघानं देखील सरकारकडे अनेक मागण्या केल्या आहेत.

### ओबीसी समाजाच्या मागण्या कोणत्या?

मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यास ओबीसी महासंघाचा विरोध

सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीलाही ओबीसी महासंघाचा विरोध

ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कोणताही धक्का न लावण्याचं आवाहन

एकीकडे बबनराव तायवाडेंनी ओबीसींवर अन्यात होत असल्याची भावना व्यक्त करत उपोषणाचं हत्यार उपसलं आहे. दरम्यान त्यांच्या या आंदोलनाला इतर ओबीसी संघटनांनी देखील समर्थन दिलंय. तर दुसरीकडे मराठा समाजाला सरसकट ओबीसीतून आरक्षण देणं शक्य नसल्याचं रामदास आठवलेंनी म्हटलंय.



मराठा आणि ओबीसींच्या संघर्षावरून महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळेंनी काँग्रेसवर हल्लाबोल केलाय. ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण द्यावं ही काँग्रेसची भूमिका आहे का? असा सवाल बावनकुळेंनी केलाय. जरांगे पाटील यांनी केलेल्या मागण्यानंतर ओबीसी आणि मराठा असा संघर्ष निर्माण होण्याची शक्यता आहे. ओबीसीतून मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी जरांगेंनी केलीय. तर जरांगेंच्या या मागणीविरोधात राष्ट्रीय ओबीसी महासंघ आक्रमक झालाय. त्यामुळे ओबीसी आणि मराठी पुन्हा एकदा आमनेसामने येण्याची चिन्ह आहेत.

## मराठा आणि ओबीसी समाजातील वादाचा मुख्य मुद्दा काय आहे?

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून सरसकट आरक्षण देण्याची मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. याला राष्ट्रीय ओबीसी महासंघाने कडाडून विरोध केला असून, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावण्याची मागणी केली आहे.

राष्ट्रीय ओबीसी महासंघाने मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून सरसकट आरक्षण देण्याच्या आणि कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीला विरोध केला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, यामुळे ओबीसी समाजाच्या विद्यमान आरक्षणाला धक्का लागेल

## मनोज जरांगे यांचा इशारा

## तर मुख्यमंत्र्यांच्या राजकीय कारकिर्दीला धोका

# मराठ्यांची मने जिंकण्याची संधी!

### शरद पवारांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्य सरकारने उपोषणाला दिलेली एक दिवसाची परवानगी म्हणजे मराठा समाजाची चेष्टा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आडमुठी भूमिका सोडून मराठ्यांना न्याय द्यावा, अन्यथा त्यांच्या राजकीय कारकिर्दीला धोका निर्माण होईल, असा इशारा मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिला. 'मी गोळ्या झेलण्यास तयार आहे; पण आरक्षण मिळेपर्यंत हटणार नाही,' असा निर्धारही त्यांनी केला.**



मराठा आंदोलकांचे पहाटे जुन्नरमध्ये येथे आगमन आले. किल्ले शिवनेरीच्या पायथ्यापासून पारंपरिक वाद्यांच्या गजरात आंदोलक हे शिवाई मंदिरात आल्यानंतर जरांगे यांच्या हस्ते शिवाई देवीची आरती करण्यात आली. त्यानंतर पत्रकार परिषदेत जरांगे म्हणाले, 'मराठा तरुणांच्या वेदना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी समजून घेणे गरजेचे आहे. उपोषणाला केवळ एक दिवसाची परवानगी देणे म्हणजे मराठा समाजाचा अपमान आहे. यातून काहीही साध्य होऊ नये, असा सरकारचा उद्देश दिसतो. समाजात नाराजी पसरली असून, याबाबतचा संदेश राज्यभर गेला आहे.''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मराठ्यांच्या नाराजीचा धोका होऊ शकतो. फडणवीस यांना मराठ्यांची मने जिंकण्याची योग्य संधी आहे. त्यांनी मराठाविरोधी भूमिका सोडून दिली पाहिजे. ते आमचे वैरी नाहीत. आम्ही फक्त लोकशाही मार्गाने आरक्षणासाठी भांडतो आहोत. फडणवीस यांनी मराठ्यांचा अवमान न करता, त्यांच्या हक्काच्या ओबीसी आरक्षणाचा विचार करून सन्मान करावा. मराठा समाज उपकार कधी विसरत नाही; पण अपमान करणाऱ्याला सोडत नाही,' असेही जरांगे म्हणाले. शिंदे समितीने कुणबी नोंदीबाबत दिलेला अहवाल फेटाळून जरांगे म्हणाले, 'गॅझेटमध्ये कुणबींची संख्या स्पष्टपणे नमूद आहे, केवळ आकडेवारी नाही,''आंदोलकांनी संयम आणि शांतता राखावी. नियमांचे पालन करावे. कोणत्याही चुकीमुळे समाजाच्या तोंडाशी आलेला घास हिरावला जाऊ नये. गरज भासल्यास आंदोलक टप्प्याटप्प्याने ये-जा करू शकतात, जेणेकरून आंदोलनाची धार कायम राहील,' असेही त्यांनी सांगितले.मराठा आरक्षण आंदोलनात सक्रिय असलेले सतीश ज्ञानोबा देशमुख (वय ४४) या आंदोलकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. जरांगे यांच्या ताफ्यासोबतच त्यांचे वाहन होते. ते लेण्याद्री येथे रात्री मुक्कामी होते. गुरुवारी सकाळी नारायणगाव येथे त्यांना हृदयविकाराचा तीव्र धक्का बसला. उपचारासाठी त्यांना नारायणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, वडील, भाऊ असा परिवार आहे. देशमुख हे बीड जिल्ह्यातील केज तालुक्यामधील वरगावचे रहिवासी आहेत.मराठा आंदोलकांचे पहाटे जुन्नरमध्ये येथे आगमन आले. किल्ले शिवनेरीच्या पायथ्यापासून पारंपरिक वाद्यांच्या गजरात आंदोलक हे शिवाई मंदिरात आल्यानंतर जरांगे यांच्या हस्ते शिवाई देवीची आरती करण्यात आली. त्यानंतर पत्रकार परिषदेत जरांगे म्हणाले, 'मराठा तरुणांच्या वेदना मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी समजून घेणे गरजेचे आहे. उपोषणाला केवळ एक दिवसाची परवानगी देणे म्हणजे मराठा समाजाचा अपमान आहे. यातून काहीही साध्य होऊ नये, असा सरकारचा उद्देश दिसतो. समाजात नाराजी पसरली असून, याबाबतचा संदेश राज्यभर गेला आहे.''मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मराठ्यांच्या नाराजीचा धोका होऊ शकतो.

### अपमान करणाऱ्याला सोडत नाही

आमचे वैरी नाहीत. आम्ही फक्त लोकशाही मार्गाने आरक्षणासाठी भांडतो आहोत. फडणवीस यांनी मराठ्यांचा अवमान न करता, त्यांच्या हक्काच्या ओबीसी आरक्षणाचा विचार करून सन्मान करावा. मराठा समाज उपकार कधी विसरत नाही; पण अपमान करणाऱ्याला सोडत नाही,' असेही जरांगे म्हणाले.शिंदे समितीने कुणबी नोंदीबाबत दिलेला अहवाल फेटाळून जरांगे म्हणाले.

# दगडूशेठसमोर महिलांचे अथर्वशीर्ष पठण

## 35 हजार महिलांनी ऋषिपंचमीनिमित्त गणरायाला नमन केले

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पावसाच्या हलक्या सरी आणि भक्तिरसाने भारलेल्या वातावरणात सुमारे ३५ हजार महिलांनी ऋषिपंचमीनिमित्त दगडूशेठ गणपतीसमोर अथर्वशीर्ष पठण केले. अथर्वशीर्षाबरोबरच महाआरती आणि गणरायाचा गजर करीत महिलांनी स्त्री शक्तीचा जागर केला. श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्या वतीने हा सोहळा आयोजित करण्यात आला होता.**



राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार, पुणे विभागाच्या धर्मादाय सहआयुक्त रजनी क्षीरसागर, न्यायाधीश किरण क्षीरसागर, प्रसेनजित फडणवीस, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, राजाभाऊ चव्हाण, शुभांगी भालेराव, अर्चना भालेराव, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यतीश रासने, सौरभ रायकर, मंगेश सूर्यवंशी, तुषार रायकर, अंकुश रासने या वेळी उपस्थित होते.

पावसाच्या हलक्या सरींनी पहाटेपासूनच शहराच्या मध्यरात्री भागात हजेरी लावायला सुरुवात केली. अशा वातावरणातही हजारो महिला मोठ्या उत्साहात अथर्वशीर्ष पठण उपक्रमात सहभागी झाल्या. महिलांनी पारंपरिक वेशात मध्यरात्री दोन वाजल्यापासून दगडूशेठ गणपतीच्या उत्सव मंडपासमोर जमायला सुरुवात केली. शंखनादाने सोहळ्याला प्रारंभ झाला. त्यानंतर मन शांत करणारा ओंकार जप, गजानना गजानना मंगलमूर्ती गजानना या गणेशगीताच्या सादरीकरणाने वातावरण मंत्रमुग्ध झाले. महिलांनी अथर्वशीर्ष पठण करीत गणरायाला नमन केले.

### 'संकटे दूर होऊ दे'

मोठ्या संख्येने महिला या उपक्रमात सहभागी झाल्या होत्या. उत्साह, अन् मांगल्याच्या वातावरणात झालेल्या अथर्वशीर्ष पठणामध्ये सहभागी होता आले. हा अवर्णनीय अनुभव आहे,' अशी भावना सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केली.'देशासमोर, राज्यासमोर जी काही संकटे येत आहेत, ती दूर होऊ दे. प्रत्येकाला सुखी, समाधानी आणि आरोग्यदायी जीवन मिळू दे,' अशी प्रार्थना त्यांनी केली.

महत्त्वाची आढावा बैठक

रस्ते, गटार, कचरा व्यवस्थापन, विद्युत कामांबाबत वाढत्या तक्रारी

# देहूरोड छावणी परिषदेत तक्रारींवर आढावा बैठक!

## आमदार शेळके यांच्या उपस्थितीत प्रशासनाला ठोस निर्देश

। देहूरोड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**रस्ते, गटार, कचरा व्यवस्थापन आणि विद्युत कामांबाबत वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर आज देहूरोड छावणी परिषदेत महत्त्वाची आढावा बैठक पार पडली. मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या बैठकीत नागरिकांच्या अडचणींवर तत्काळ उपाययोजना करण्याचे आदेश देण्यात आले.**



मुख्य कार्यकारी अधिकारी गीतांजली रावत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या चर्चेत आमदार शेळके यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश दिले की, नागरिकांना मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी ठोस पावले उचलावीत आणि वेळमर्यादेत काम पूर्ण करावे.

बैठकीदरम्यान रावत यांनी माहिती दिली की, येत्या काही दिवसांत देहूरोडमध्ये “शासन आपल्या दारी” हा उपक्रम राबविण्यात येणार असून, त्याअंतर्गत शासकीय दाखले, आधारकार्ड, रेशनकार्ड, मतदानकार्ड आणि विविध योजनांचे लाभ नागरिकांना सहज मिळतील. या बैठकीस विविध विभागांचे अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी आणि तक्रारींवर तातडीने कारवाई करण्याचा निर्धार बैठकीत करण्यात आला.

# आरक्षण सोडत ठरवणार पालिका राजकारण

## प्रारूप प्रभागरचनेनंतर अंदाज घेण्यास सुरुवात; सोडतीनंतर राजकीय प्रचाराला सुरुवात

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीसाठी महत्त्वाचा टप्पा पार पडला असून, प्रभागांची प्रारूप रचना जाहीर केली गेली आहे. यावर सूचना व हरकतींच्या प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. लवकरच या सूचनांवर सुनावणी होऊन अंतिम प्रभाग रचना स्पष्ट होईल. त्यानंतर आरक्षणाची संगणकीकृत सोडत काढण्यात येणार आहे. प्रभागात नव्याने आरक्षण पडेल की, २०१७ प्रमाणेच राहील, याची चाचपणी सुरू झाली आहे.**





आरक्षण सोडतीनंतर निवडणुकीसाठीच्या इच्छुकांच्या प्रचाराचा नारळ फुटणार आहे. महापालिकेची प्रारूप प्रभागरचना २०१७ नुसारच असली तरीही मतदारसंख्या वाढल्याने निवडणूक यंदा आरक्षणाच्या गणितांवर निर्णायक ठरणार आहे. महिला, मागासवर्गीय व अनुसूचित जाती-जमातींसाठी विविध प्रभाग राखीव करण्यात आल्याने २०१७मधील दिग्गजांना यंदा मुकाबला सोपा जाणार नाही. जुन्या नेत्यांच्या जागांमध्ये बदल होण्याची शक्यता वाढली आहे.

### कुठला प्रभाग कुणासाठी राखीव

सत्ताधारी पक्ष आणि विरोधक दोघेही आता कुठला प्रभाग कुणासाठी राखीव होणार, याचा अंदाज घेत रणनीती तयार करत आहेत. अनेक इच्छुकांनी संभाव्य जागांची गणिते आखली असून काही प्रभागांमध्ये नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे, निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या नेत्यांचे लक्ष आता प्रभागांच्या आरक्षणावर केंद्रित झाले आहे.


### असे होते २०१७ ला प्रभागनिहाय आरक्षण

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती | २० जागा |
| अनुसूचित जमाती | ३ जागा |
| इतर मागास वर्ग (ओबीसी) | ३५ जागा |
| सर्वसाधारण महिला | ३५ जागा (खुला) |
| सर्वसाधारण (खुला) | ३५ जागा |
| **एकूण** | **१२८** |

### अंतिम प्रभाग रचनेनंतर चित्र स्पष्ट

अंतिम प्रभाग रचना व आरक्षणाची घोषणा होताच आगामी पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीचे राजकीय वातावरण स्पष्ट होईल आणि त्यावरच पुढील राजकीय लढतीचा पाया रचला जाईल. या टप्प्यानंतर उमेदवार व पक्षांसाठी आगामी रणनीती आखणे शक्य होणार आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### हेतू शुद्ध ठेवावा

मनुष्याने शुद्ध हेतू ठेवण्याचा प्रयत्न करावा. हेतू शुद्ध असला की स्वाभाविकच कृती त्याला अनुरूप होऊ लागते आणि प्रगतीला मदत होते. हेतू हा विहिरीत असणाऱ्या झऱ्याप्रमाणे आहे. झरा गोड पाण्याचा असला म्हणजे विहिरीचे पाणी स्वाभाविकच गोड असते. म्हणून हेतू शुद्ध ठेवण्याची दक्षता घ्यावी, आणि त्याकरिता रामाची प्रार्थना करावी. माणसाला देहरक्षणापुरते अन्न, वस्त्र आणि नाम घेण्याची बुद्धी असली ही असमाधानाला जागा नाही. ‘ नको दैन्यवाणे जिणे भक्तिऊणे ’ हेच रामरायाजवळ मागावे. पर्वकाळात भगवंत कामधेनूचा अवतार घेऊन येतो; जे ज्याला पाहिजे ते तो देतो. पर्वकाळात सज्जन तसेच दुर्जनही आपली कामे करून घेतात. जारण-मारण ही देखील पर्वकाळात शीघ्र साध्य होतात. आपण मात्र भगवंताचे कसे व्हावे हे पाहावे. शुभेच्छा धरावी, भावना जागृत करावी. ‘ काहीही कर, पण भगवंता तुझा विसर पडू देऊ नकोस, ’ असे भगवंताजवळ मागावे. ‘ आजवर कळत न कळत जे पाप झाले असेल ते नाहीसे कर. पुढे पुन: नाही करणार, ’ असे म्हणावे, म्हणजे मागली पापे नष्ट होतात. ज्याला विषयाची गोडी असते त्याला नाही परमार्थाची गोडी लागत. नरकातल्या किड्यांना नाही किळस येत. विषयी लोक प्रपंचात रंगून जाऊन साधुसंतांची निंदा करतात. त्यांना ‘ मीच काय तो एक शहाणा, मोठा,’ असा अभिमान असतो. पण त्यांच्यापेक्षा लक्षावधी शहाणे आणि श्रीमंत जगात आहेत हे ते जाणत नाहीत. ते खालच्या लोकांकडे पाहतात आणि त्यांच्याहून मी श्रेष्ठ आहे असे म्हणतात. माझे चुकते आहे एवढे कळले तरी चालेल. विषयी लोकांना ‘मला कुठे दु:ख आहे ?’ असे वाटते. पण दारूप्रमाणे विषयाची धुंदी उतरली म्हणजे पश्चात्ताप होतो. ‘ देव आहे ’ असे खऱ्या अर्थाने वाटणारे जगामध्ये थोडेच असतात. सद्विचार, सच्छास्त्र आणि सद्‌बुद्धी ही प्रत्येक माणसाला याच जन्मात भगवंताकडे नेण्यासाठी आहेत. प्रपंचाचा अनुभव कष्टमय आहे, पण भगवंताचा अनुभव आनंदमय आहे. तापाने आजारी असलेल्या माणसाला आपल्याला घाम यावा असे वाटत असते. पण नुसत्या वाटण्याने काही तो येत नाही, त्यासाठी डॉक्टरचे औषध घ्यावे लागते. तसे, ज्याला भगवंताचे प्रेम यावे असे वाटते, त्याने नाम घेणे हेच एक औषध घ्यावे. भगवंताचे प्रेम एकदा चिकटले की त्याच्या आड दुसरे काही येत नाही. खाणीतल्या दगडामध्ये जसे सोने असते, तसा आपल्यामध्ये परमात्मा आहे. दगडातली माती अनेक चाळण्यांनी आणि यंत्रांनी काढून टाकतात आणि नंतर सोने हाती लागते, त्याचप्रमाणे अनेक वासना नष्ट झाल्यानंतर परमात्मा आपल्या हाती लागतो. आपण ‘ मी ’ पणाने मेल्यानंतर शेवटी परमात्मा प्रकट होतो.

बोधवचन:- शुद्ध असावे आचरण। तसेच असावे अंतःकरण। त्यात भगवंताचे स्मरण। हेच प्रपंच सुखी करण्याचे साधन॥



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

# लोकशाहीचे आखाडे..!



**सुमारे पाच आठवडे चाललेलं संसदेचं अधिवेशन परवा संस्थगित झालं. दिनदर्शिकेनुसार दिवस मोजले, तर ते साधारण पाच आठवडे होतात. पण, संसदेच्या काय किंवा विधिमंडळाच्या काय, कुठल्याच अधिवेशनाचा तो खरा कालावधी नसतो. प्रत्येक आठवड्यात अधिवेशनाला शनिवारी-रविवारी साप्ताहिक सुट्टी असतेच. शिवाय, अधिवेशनाच्या नियोजित कालावधी अंतर्गत येणाऱ्या नैमित्तिक सुट्ट्याही असतातच. त्यामुळे, ‘अमुक एक आठवड्यांचं अधिवेशन’ म्हटलं, तरी प्रत्यक्षात कामकाजाचे दिवसच मोजायचे असतात.**

त्यात पुन्हा सभागृहात वातावरण तापलं, की होणारी तात्पुरती, वारंवार किंवा दिवसभरासाठी तहकुबी असतेच. तोही काळ अधिवेशनाच्या नियोजित कालावधीतून वजा करावा लागतो. त्यामुळे, कोणतंही अधिवेशन ‘किती कालावधीचं?’ याचं उत्तर नेहमी दिवसांच्या हिशेबातच दिलं जात असलं, तरी ‘अधिवेशन, म्हणजे कामकाज नेमकं किती काळ चाललं!’ याचं उत्तर हल्ली तासांच्या हिशेबातच द्यावं लागतं. त्याअर्थाने नुकत्याच संपलेल्या अधिवेशनात राज्यसभेचं कामकाज एकूण ४१ तास, तर लोकसभेचं केवळ ३७ तास चाललं. हे आकडे फारच कमी दिसतात म्हणून की काय, पण अधिवेशनाची गोळाबेरीज सांगताना दोन्ही सभागृहांच्या कामकाजाच्या कालावधीची बेरीज करून ‘अधिवेशनाचं कामकाज ७८ तास चाललं’ असं सांगितलं गेलं आहे. टक्केवारी पाहायला गेलो, तर नियोजित कामकाजापेक्षा लोकसभेत फक्त ३१ टक्के आणि राज्यसभेत ३९ टक्केच कामकाज होऊ शकलं आहे! अधिवेशनाचं कामकाज ठरवताना सरकारने जी विषयपत्रिका ठरवली होती, जी विधेयकं मांडण्याचं ठरवलं होतं, अन्य सरकारी कामकाज ठरवलं होतं, त्यातलं बहुशः झालं. पण, त्यात लोकप्रतिनिधींचा सहभाग किती होता? असा प्रश्न विचारला, तर त्याचं उत्तर मात्र अत्यंत निराशाजनक आहे.

संसदेच्या अधिवेशनासाठी सरकारी तिजोरीतून; म्हणजेच जनतेच्या खिशातून दर मिनिटासाठी अडीच लाख रुपये खर्च केला जातो. हा खर्च किती प्रमाणात आणि कशासाठी वाया जातो आहे, हे पाहिलं की लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराला कशाचं रूप आलं आहे? असा प्रश्न आल्याशिवाय राहत नाही. अधिवेशनाचं कामकाज वेळेच्या दृष्टीने फारसं समाधानकारक झालं नसलं, तरी विषय आणि घडामोडी पाहता अधिवेशनाने सामान्य जनतेचं लक्ष खिळवून ठेवलं होतं, हे नक्की. ‘ऑपरेशन सिंदूर’वरची चर्चा अधिवेशनाच्या अगदी सुरुवातीलाच ठेवून सरकारने बाजी मारली होतीच.

या चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः लोकसभेत उत्तर देणार हे निश्चित झाल्याने चर्चेचा परिणाम जनतेत सकारात्मकच जाणार हे सुनिश्चित होतं. झालंही तसंच. लोकसभेत ७३, तर राज्यसभेत ६५ सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना मोदी आणि राज्यसभेत अमित शहा यांनी इतकं समर्पक आणि प्रभावी उत्तर दिलं, की त्यामुळे विरोधकांना आपलं अस्तित्व दाखवण्यासाठी अन्य हत्यार उपसावं लागणार हे पहिल्या आठवड्यातच स्पष्ट झालं होतं. राहुल गांधी यांचा ‘मतचोरी’चा मुद्दा सभागृह आणि सभागृहाबाहेर त्यामुळेच विरोधकांनी अखेरपर्यंत धरून ठेवला.

बिहारची निवडणूक आता हातातोंडाशी आली आहे. हिंदी पट्ट्यातलं हे महत्त्वाचं राज्य त्यामुळे सध्या सत्ताधारी आणि विरोधकांची रणभूमी आहे. तिथल्या मतदार याद्यांचा मुद्दा घेऊन; त्याला महाराष्ट्रासह अन्य राज्यातील आरोपांची जुनीच फोडणी देऊन विरोधकांनी संपूर्ण अधिवेशनात हंगामा केला. त्याचं टोक अधिवेशनाच्या शेवटच्या दोन दिवसांत गाठलं गेलं. शाह लोकसभेत जेव्हां ‘संविधान (१३०वी) दुरुस्ती विधेयक २०२५’, ‘संघराज्य शासन (दुरुस्ती) विधेयक २०२५’ आणि ‘जम्मू-काश्मीर पुनर्रचना (दुरुस्ती) विधेयक २०२५’ ही तीन अत्यंत महत्त्वाची विधेयकं मांडत होते, तेव्हां विरोधी बाकांवरून त्यांच्या दिशेने विधेयकाच्या मसुद्यांचे फाडलेले कागद आणि बोळे भिरकावले जात होते! यातून विरोधकांच्या हाती काय लागलं? पूर्वनियोजनानुसार सरकारने ही तीनही विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवण्याचा प्रस्ताव मांडला आणि गोंधळातच मंजूरही केला. म्हणजे, ज्यांनी या विधेयकावर संसदेत सहभाग नोंदवण्याचं टाळलं त्यांना आता संयुक्त चिकित्सा समितीत भाग घ्यावाच लागेल. त्यांचा सहभाग नोंदवून तिथून आलेलं विधेयक सभागृहात मंजूर केलं जाईल. तेव्हा विरोधकांकडे दुसरा कोणताही प्रत्यवाय नसेल!!

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचा अवचित राजीनामा ही या अधिवेशनातील सरकारच्या कौशल्याची आणखी एक घटना ठरली. धनखड यांनी राजीनामा दिला नाही; तो द्यावा लागला, हे आता जगजाहीर झालं आहे. पण, तो का द्यावा लागला? याविषयी अद्यापही कोणी ठोस सांगू शकत नाही. ‘दिल्ली’तून जे सांगितलं जातं आहे, त्या शक्यताच आहेत. केंद्र सरकारचा किल्ला किती कडेकोट आहे, याचा अंदाज यावरून यावा! शेवटी, अधिवेशनाचं फलित काय? तर, सरकारने त्यांचं बहुतेक सगळं कामकाज रेटून नेलं. विरोधकांनी गोंधळ घालून त्यात अडथळा आणण्याचा खूप प्रयत्न केला; पण त्यांच्या आणि एकूणच सभागृहाच्या सहभागाशिवाय ते पूर्ण झालं. लोकप्रतिनिधींचा सहभाग नाही, म्हणजे प्रातिनिधिक लोकशाहीत जनतेचाच सहभाग नाही. अशा सहभागाविना चाललेली सभागृह ही सभागृह तरी कशी म्हणायची? ते आखाडेच ठरतात. घराघरांतून टीव्हीच्या पडद्यावर पाहण्यासाठी!!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## विरार इमारत दुर्घटना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या संवेदना

# विरार इमारत दुर्घटनेत 17 जणांचा मृत्यू

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विरार इमारत दुर्घटनेत आतापर्यंत इमारतीच्या ढिगाऱ्याखालून २४ जणांना बाहेर काढण्यात आले आहे. त्यात १७ जणांचा मृत्यू झाला आहे. अजूनही मागील ४८ तासांपासून राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक व पालिकेच्या अग्निशमन दलाकडून बचावकार्य सुरू आहे. मंगळवारी रात्री विरार पूर्वेच्या विजयनगर परिसरातील रमाबाई अपार्टमेंट या इमारतीचा काही भाग कोसळल्याची घटना घडली. या इमारतीच्या ढिगाऱ्यात अनेक कुटुंब गाडली गेली. या कुटुंबांचे शोधकार्य राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक व वसई विरार महापालिका अग्निशमन दलाकडून सुरू करण्यात आले आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोस्ट केली आहे.**

## मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत




विरार भागात एक इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झालेला आहे, याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे आणि मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. या सर्व कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे सांगतानाच मृतांच्या वारसांना ५ लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली आहे.४८ तासांपासून एनडीआरएफच्या मदतीने हे बचाव कार्य राबवले जात आहे आणि ते पुढच्या काही तासात संपेल. आतापर्यंत नऊ जणांना सुरक्षित वाचविण्यात आले आहे. अशी पोस्ट देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.जखमींमध्ये संजय सिंग(२४), मिताली परमार(२८) प्रदीप कदम( ४०) जयश्री कदम (३३) विशाखा जोविल (२४), मंथन शिंदे (१९) प्रभाकर शिंदे (५७), प्रमिला शिंदे (५०) प्रेरणा शिंदे (२०) अशी नऊ जण जखमी असून त्यांच्यावर वसई विरार मधील शासकीय व खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मंगळवारी रात्री विरार पूर्वेच्या विजयनगर परिसरातील रमाबाई अपार्टमेंट या इमारतीचा काही भाग कोसळल्याची घटना घडली. या इमारतीच्या ढिगाऱ्यात अनेक कुटुंब गाडली गेली. या कुटुंबांचे शोधकार्य राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक व वसई विरार महापालिका अग्निशमन दलाकडून सुरू आहे. सुरुवातीला ढिगारा बाजूला करण्यासाठी जेसीबी पोहचू शकत नसल्याने बचावकार्यात अडथळे निर्माण झाले होते. मात्र इमारती आणि बाजूच्या चाळी रिकाम्या करून काही भाग तोडल्याने बचाव कार्याला गती मिळाली. या इमारतीमध्ये चौथ्या मजल्यावर राहणाऱ्या प्रथमेश यांच्या बुधवारी गणपती बाप्पाची स्थापना होणार होती. त्याआधीच रात्री या इमारतीमध्ये दुर्घटना घडली. सध्या रहिवाश्यांना इथून हलविण्यात आलं आहे. प्रथमेश यांनाही आपल्या सामानासह गणपतीची मूर्ती घेऊन घर सोडावे लागलं आहे. विरार इमारत दुर्घटनेत आतापर्यंत इमारतीच्या ढिगाऱ्याखालून २४ जणांना बाहेर काढण्यात आले आहे. त्यात १७ जणांचा मृत्यू झाला आहे. अजूनही मागील ४८ तासांपासून राष्ट्रीय आपत्ती निवारण पथक व पालिकेच्या अग्निशमन दलाकडून बचावकार्य सुरू आहे. मंगळवारी रात्री विरार पूर्वेच्या विजयनगर परिसरातील रमाबाई अपार्टमेंट या इमारतीचा काही भाग कोसळल्याची घटना घडली. या इमारतीच्या ढिगाऱ्यात अनेक कुटुंब गाडली गेली.पथक व वसई विरार महापालिका अग्निशमन दलाकडून सुरू करण्यात आले आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोस्ट केली आहे. विरार भागात एक इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झालेला आहे.

### फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त केले

मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे. या सर्व कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असे सांगतानाच मृतांच्या वारसांना ५ लाख रुपयांची मदत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केली आहे.४८ तासांपासून एनडीआरएफच्या मदतीने हे बचाव कार्य राबवले जात आहे आणि ते पुढच्या काही तासात संपेल. आतापर्यंत नऊ जणांना सुरक्षित वाचविण्यात आले आहे. अशी पोस्ट देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.जखमींमध्ये संजय सिंग(२४), मिताली परमार(२८) प्रदीप कदम( ४०) जयश्री कदम (३३) विशाखा जोविल (२४), मंथन शिंदे (१९) प्रभाकर शिंदे (५७), प्रमिला शिंदे (५०) प्रेरणा शिंदे (२०) अशी नऊ जण जखमी असून त्यांच्यावर वसई विरार मधील शासकीय व खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# सिंधुदुर्गमध्ये दीड दिवसांच्या गणपतीला निरोप

## आमदार दीपक केसरकर यांनी केले नैसर्गिक कुंडात विसर्जन

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषात सिंधुदुर्ग जिल्ह्यात दीड दिवसांच्या गणपतीचे विसर्जन वाजतगाजत मिरवणुकीने करण्यात आले. आमदार दीपक केसरकर यांनी सावंतवाडीमध्ये नैसर्गिक कुंडात गणेशमूर्तीचे पर्यावरणपूरक विसर्जन केले. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला घरोघरी गणपतीची स्थापना झाल्यानंतर दीड दिवसांच्या गणपतीला भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला.**



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये दीड दिवसांच्या गणपतीचे विसर्जन मोठ्या उत्साहात पार पडले.गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या'च्या जयघोषात लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात आला. गुरुवारी सायंकाळनंतर मोती तलावात,नदीत गणेशमूर्तींचे विसर्जन सुरू झाले आणि रात्री उशिरापर्यंत ते सुरू होते. राजघराण्याचा ऐतिहासिक गणपतीदेखील राजघराण्याच्या उपस्थितीत मोती तलावात विसर्जित करण्यात आला. राजवाडा व राजश्री तिसरे खेमसावंत यांच्या माठ्यातील गणपतीचे विसर्जनही वाजतगाजत मिरवणूक काढून करण्यात आले.

यावेळी खेमसावंत भोसले, सौ. शुभदादेवी भोसले, माजी उपनगराध्यक्षा अन्नपूर्णा कोरगावकर, माजी नगरसेविका ॲड. पुष्पलता कोरगावकर, काका मांजरेकर, पुरोहित शरद सोमण, सिताराम गवस, सचिन कुलकर्णी, अखिलेश कोरगावकर यांच्यासह अनेक गणेशभक्त उपस्थित होते.ग्रामीण भागातही दीड दिवसांच्या गणेशाला पुढच्या वर्षी लवकर येण्याचे वचन देत जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला.

### भक्तिभावाने गणपतीला निरोप

नदी, तलाव आणि पाणवठ्यांच्या ठिकाणी मूर्तींचे विसर्जन झाले. यावेळी भजन, आरती आणि फटाक्यांच्या आवाजाने परिसर दणाणून गेला होता. सिंधुदुर्ग जिल्ह्यात रात्री उशिरापर्यंत मोठ्या भक्तिभावाने गणपतीला निरोप देण्यात आला. तसेच पोलिसांची कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. गणेशभक्तांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी चोख व्यवस्था करण्यात आली होती.

पुराचा फटका

## वाराणसीतील घाट जलमय, बस्तरमध्ये ८ जणांचा मृत्यू

# उत्तर प्रदेश, छत्तीसगडला पुराचा फटका

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुसळधार पावसामुळे जम्मू-काश्मीर, हिमाचलपाठोपाठ उत्तर प्रदेश, छत्तीसगड, पंजाब आदी राज्यांमधील जनजीवनही मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहे. छत्तीसगडमधील बस्तर जिल्ह्यात पुरामुळे आठ जणांचा मृत्यू झाला. येथील दंतेवाडा, विजापूर जिल्ह्यांनाही मुसळधार पावसाने झोडपले. तर, उत्तर प्रदेशात वाराणसी येथे गंगा नदीचे पाणी घाटांवर गेल्याने येथील आरती, अंत्यसंस्कारावर परिणाम झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पंजाबमधील पूरग्रस्त भागांत प्रशासनाच्या वतीने बचावकार्य केले जात आहे.**

## संबंधित विभागांना सतर्कतेचे निर्देश



प्रयागराजमध्ये गंगेची पाणी पातळी गुरुवारी सकाळी ७०.२६२ मीटर इशारा चिन्ह ओलांडून ७०.९१ मीटरवर पोहोचली, ७१.२६२ मीटर ही या नदीची धोका पातळी आहे. पुराच्या पाण्याने दशाश्वमेध घाट, हरिश्चंद्र आणि मणिकर्णिका घाटही पाण्याखाली गेले. वाढती पाण्याची पातळी आणि पुराची शक्यता लक्षात घेता, जिल्हा प्रशासनाने संबंधित विभागांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. छत्तीसगडमधील बस्तरमध्ये पुरामुळे आठ नागरिकांचा मृत्यू झाला असून, ९६ पशुधन मृत्युमुखी पडले आहेत, तसेच सुमारे ४९५ घरे आणि १६ छोट्या पुलांचे नुकसान झाले आहे. पूरग्रस्त भागातील सुमारे दोन हजाराहून अधिक नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आल्याचे प्रशासनातर्फे सांगण्यात आले. हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमधील पाणलोट क्षेत्रात मुसळधार पावसामुळे सतलज, बियास आणि रावी नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होऊन पंजाबमधील शेती आणि गावांचा मोठा भाग पाण्याखाली गेला. पठाणकोट, गुरुदासपूर, फाजिल्का, कपूरथला, तरनतारन, फिरोजपूर, होशियारपूर आणि अमृतसर आदी जिल्ह्यांमधील जनजीवन विस्कळीत झाले.आंध्र प्रदेशातील विजयवाडा येथील प्रकाशम बॅरेज येथे मुसळधार पावसामुळे कृष्णा नदीच्या पाणी पातळीत गुरुवारी मोठी वाढ झाली. या पार्श्वभूमीवर प्रशासनातर्फे नदीकाठच्या भागात राहणाऱ्या लोकांना खबरदारी घेण्याचा इशारा देण्यात आला आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये गेले तीन-चार दिवस मुसळधार कोसळणाऱ्या पावसाने गुरुवारी काहीशी उसंत घेतली. त्यामुळे अनेक ठिकाणी पुराचा धोका कमी झाला. झेलम आणि इतर नद्यांमधील पाणी पातळीतही घट झाली आहे. बुधवारी ज्या भागात पाणी भरले होते तेथेही पाणी कमी होऊ लागले आहे. दरम्यान, ३० ऑगस्ट ते १ सप्टेंबर या कालावधीत जम्मूच्या काही जिल्ह्यांमध्ये मध्यम ते मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.लाहोर : पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील शेकडो गावे पाण्याखाली गेल्याने किमान १७ जणांचा मृत्यू झाल्याचे अधिकाऱ्यांनी गुरुवारी सांगितले. सतलज, रावी आणि चिनाब नद्यांना आलेल्या पुरामुळे कोट्यवधी नागरिकांचे स्थलांतर, पायाभूत सुविधांचे नुकसान, लाखो एकर शेतीजमीन पाण्याखाली गेली आहे.प्रयागराजमध्ये गंगेची पाणी पातळी गुरुवारी सकाळी ७०.२६२ मीटर इशारा चिन्ह ओलांडून ७०.९१ मीटरवर पोहोचली, ७१.२६२ मीटर ही या नदीची धोका पातळी आहे. पुराच्या पाण्याने दशाश्वमेध घाट, हरिश्चंद्र आणि मणिकर्णिका घाटही पाण्याखाली गेले. वाढती पाण्याची पातळी आणि पुराची शक्यता लक्षात घेता,छत्तीसगडमधील बस्तरमध्ये पुरामुळे आठ नागरिकांचा मृत्यू झाला असून, ९६ पशुधन मृत्युमुखी पडले आहेत, तसेच सुमारे ४९५ घरे आणि १६ छोट्या पुलांचे नुकसान झाले आहे. पूरग्रस्त भागातील सुमारे दोन हजाराहून अधिक नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्यात आल्याचे प्रशासनातर्फे सांगण्यात आले.

### पाणी पातळीत मोठी वाढ

मुसळधार पावसामुळे सतलज, बियास आणि रावी नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होऊन पंजाबमधील शेती आणि गावांचा मोठा भाग पाण्याखाली गेला. पठाणकोट, गुरुदासपूर, फाजिल्का, कपूरथला, तरनतारन, फिरोजपूर, होशियारपूर प्रकाशम बॅरेज येथे मुसळधार पावसामुळे कृष्णा नदीच्या पाणी पातळीत गुरुवारी मोठी वाढ झाली.

# विधेयके प्रलंबित ठेवता येणार नाहीत!

## राज्यपालांकडून विलंब का, सर्वोच्च न्यायालयाचा सवाल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राज्यांच्या विधानसभांनी संमत केलेली विधेयके राज्यपाल मंजुरी न देता अनंतकाळ अडवून ठेवत असतील तर, राज्यघटनेच्या अनुच्छेद २००मध्ये वापरलेल्या 'शक्य तितक्या लवकर' या संज्ञेला कोणताही अर्थ उरणार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी स्पष्ट केले.**



विधेयके मंजूर करण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपाल यांच्यासाठी कालमर्यादा निश्चित करता येईल का या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यीय घटनापीठासमोर सुनावणी सुरू आहे. सरन्यायाधीश भूषण रामकृष्ण गवई, न्या. सूर्य कांत, न्या. विक्रम नाथ, न्या. पी. एस. नरसिंह आणि न्या. अतुल चांदुरकर यांचा या घटनापीठात समावेश आहे.या प्रकरणी केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. राज्य विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांवर राष्ट्रपती आणि राज्यपाल यांनी केलेल्या कार्यवाहीविरोधात, मूलभूत अधिकारांअंतर्गत राज्य सरकारांना सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करता येणार नाही असे सरकारने त्यात नमूद केले आहे.

सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की, घटनाकारांनी जाणीवपूर्वक आधीची सहा आठवड्यांची कालमर्यादा काढून त्याऐवजी अनुच्छेद २००मध्ये 'शक्य तितक्या लवकर' हा शब्दप्रयोग वापरला. विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी या शब्दप्रयोगाकडे दुर्लक्ष करता येईल का असा प्रश्न न्यायालयाने केंद्राला विचारला.अनुच्छेद २००नुसार राज्यपालांना राज्य विधानसभांनी मंजूर केलेल्या विधेयकांवर निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

### अनुच्छेद २००ची तरतूद

विधेयक राष्ट्रपतींसाठी राखीव ठेवणे या अधिकारांचा समावेश आहे. वित्त विधेयक नसेल तर राज्यपाल 'शक्य तितक्या लवकर' त्यावर निर्णय घेऊ शकतात अशी अनुच्छेद २००ची तरतूद आहे.मूलभूत अधिकारांअंतर्गत राज्य सरकारांना सर्वोच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करता येणार नाही असे सरकारने त्यात नमूद केले आहे.

**गणेशोत्सवाची जोरात धामधूम सुरू आहे. गणेशोत्सवात मोठा उत्साह असतो. प्रत्येक गावांत, शहरातील गल्ली गल्लीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सर्जनशील आणि आकर्षक सजावटीसह गणेशोत्सव साजरा करतात.पुणे तसेच मुंबई, कोकणातील काही गणेश मंदिरे आहेत ज्यांचा गणेशोत्सव फार वेगळा आणि पाहण्यासारखा असतो. अशा या 8 प्रसिद्ध गणेश मंदिरांना आवश्य भेट द्या. या 8 गणेश मंदिरांविषयी विशेष माहिती खास महाईन्यूजच्या वाचकांसाठी...**



## पुण्यातील कसबा गणपती-



पुण्यातील ज्या ठिकाणी गणेशोत्सव सुरू झाला. सर्वांचा पहिला मानाचा (पूज्य) गणेश म्हणजे कसबा गणेशोत्सव मंडळाचा कसबा गणपती. पुण्यातील सर्व गणपतींच्या महत्त्वाच्या यादीत हा सर्वात वरच्या स्थानी आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांनी 1639 मध्ये बांधलेले हे गणेश मंदिर 10 व्या दिवशी विसर्जन करण्यात येतो. कसब्यानंतरच इतर सर्व मंडळे आपापल्या उत्सवात पुढे जातात. किंबहुना, या गणेशाचे महत्त्व इतके आहे की, महापौर स्वत: पूजेला जातात.

## केसरीवाडा गणपती-



शेवटचा पण सर्वात कमी मानाचा गणपती म्हणजे केसरीवाडा गणपती. 1894 मध्ये स्वतः बाळ टिळकांनी वसाहतवाद्यांच्या विरोधात जनतेला एकत्र आणण्याचा एक मार्ग म्हणून सुरुवात केली, त्यांनी आतापर्यंतची सर्वात यशस्वी क्रांती सुरू केली. केसरीवाडा आजही, ट्रस्ट सजावटीवर कमी आणि लोकांना एकत्र आणणाऱ्या आणि बंधुत्वाची भावना निर्माण करणाऱ्या विविध उपक्रमांवर जास्त खर्च करते. हा एक पाहण्यासारखा देखावा आहे.

## तांबडी जोगेश्वरी गणपती -



पुण्याचा दुसरा मानाचा (पूज्य) गणपती म्हणजे तांबडी जोगेश्वरी. 15 व्या शतकात बांधलेले हे मूळत: दुर्गा देवीचे मंदिर आहे. गणेशमूर्तीचे विसर्जन केले जाते आणि त्यानंतर सलग वर्षभर इतर गणेश मंदिरांप्रमाणे त्याची स्थापना केली जाते. सजावट इतकी सुंदर असते की, खरोखरच पाहून तुमचे मन प्रसन्न होईल.

## सिद्धिविनायक गणपती-



आर्थिक राजधानीचा सर्वात प्रसिद्ध गणपती, प्रभादेवी, मुंबई येथे आहे. भारतातील सर्वात श्रीमंत मंदिरांपैकी एक, त्याचा गणेशोत्सव उत्सव पाहून तुम्ही खुश व्हाल. कारण त्यांची असलेली सुंदर वास्तुकला पाहिल्यानंतर निश्चितच फायदेशीर ठरेल.


## गुरुजी तालीम गणपती-



पुण्याचा तिसरा मानाचा गणपती, तो 1887 मध्ये भिकू शिंदे आणि उस्ताद नलबान या हिंदू आणि मुस्लिम कुटुंबांनी बांधले होते. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करण्याआधी त्याची स्थापना केल्यामुळे या मंदिराला सर्वात जुन्या मंदिरांपैकी एक असल्याचा मान मिळाला.

# गं गणपतये नमः

## दगडूशेठ हलवाई-



पुण्याला भेट द्यायलाच हवी, हे पूर्वेकडील ऑक्सफर्डचे सर्वात श्रीमंत गणेश मंदिर आहे. मूर्ती सोन्याने मढवली असून मंदिरात सर्वत्र श्रीमंती दिसून येते. दगडूशेठ गणपतीचा तब्बल 10 दशलक्ष रुपयांचा विमा उतरवला आहे!!!



## तुळशीबाग गणपती-



पुण्याच्या मध्यभागी असलेला हा शहरातील चौथा मानाचा गणपती आहे. शहराच्या मध्यभागी असल्यामुळे सर्वात जास्त भेट दिलेल्या गणेश मंदिरांपैकी एक असल्याचा अभिमान बाळगण्याचा अधिकार मिळतो. येथील विधी तुम्हाला थक्क करून सोडतील.



## गणपतीपुळे गणपती-



गणपतीपुळे हे कोकण विभागातील रत्नागिरी जिल्ह्यात वसलेले एक छोटे शहर आहे, ज्यामध्ये प्राचीन समुद्रकिनारे आहेत. व्यस्त दैनंदिन जीवनापासून दूर जाण्यासाठी आणि शहराच्या गजबजाटातून आणि आपल्या कुटुंबासह, मित्रमैत्रिणींसोबत किंवा आपल्या जोडप्यासह नैसर्गिक सौंदर्यादरम्यान दर्जेदार वेळ घालवण्यासाठी हे लहान समुद्रकिनारा शहर योग्य ठिकाण आहे.

**दमदार शतक**

## रजत पाटीदारचं पहिल्याच लढतीत दमदार शतक

# पाटीदार दुलीप ट्रॉफीत चमकला!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशांतर्गत क्रिकेटमधील महत्वाची स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या दुलीप ट्रॉफी २०२५ स्पर्धा दमदार सुरूवात झाली आहे. या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा देखील संघात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे स्पर्धेचा रोमांच आणखी वाढणार आहे. या स्पर्धेत दमदार कामगिरी करून खेळाडू भारतीय संघात स्थान मिळवण्याच्या प्रयत्नात असणार आहे. दरम्यान आयपीएल स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचं नेतृत्व करणाऱ्या रजत पाटीदारने या स्पर्धेतील क्वार्टर फायनलच्या सामन्यात शतक झळकावलं आहे.**

### क्वार्टर फायनलच्या सामन्यात शतक



या स्पर्धेसाठी सेंट्रल झोन संघाची जबाबदारी ध्रुव जुरेलकडे सोपवण्यात आली होती. मात्र, तो आजारी असल्याने या सामन्यात खेळू शकलेला नाही. त्याच्याजागी संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी रजत पाटीदारकडे सोपवण्यात आली आहे. ही जबाबदारी योग्यरित्या पार पाडून त्याने पहिल्याच डावात दमदार शतक झळकावलं आहे. सेंट्रल झोन संघाचा सामना नॉर्थ इस्ट झोन संघाविरूद्ध सुरू आहे. पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या सेंट्रल झोन संघाला सुरूवातीलाच पहिला मोठा धक्का बसला. त्यावेळी संघाची धावसंख्या केवळ ४ होती. त्यानंतर चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी आलेल्या रजत पाटीदारने दमदार फलंदाजी केली आणि शतक पूर्ण केलं. त्याच्या आधी तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या दानिश मालेवारने आधी शतक पूर्ण केलं.रजत पाटीदारच्या या खेळीचं वैशिष्ट्ये म्हणजे, त्याने कसोटी क्रिकेटमध्येही वनडे स्टाईल आक्रमक फलंदाजी केली. ज्यावेळी तो १११ धावांवर फलंदाजी करत होता. त्यावेळी त्याने अवघे ८५ चेंडू खेळून काढले होते. यादरम्यान त्याने २० चौकार आणि २ षटकार मारले होते.यादरम्यान त्याने १३० च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. कसोटी क्रिकेटमध्ये खूप कमी फलंदाज आहेत, जे या स्ट्राईक रेटने फलंदाजी करतात.रजत पाटीदारला भारतीय संघासाठी ३ कसोटी आणि १ वनडे सामना खेळण्याची संधी मिळाली आहे. मात्र, तो वनडे आणि कसोटी संघातून बाहेर आहे.

भारतासाठी खेळताना त्याने ३ कसोटी सामन्यांमध्ये ६३ धावा केल्या आहेत. तर वनडे सामन्यात त्याला २२ धावा करता आल्या आहेत.या स्पर्धेसाठी सेंट्रल झोन संघाची जबाबदारी ध्रुव जुरेलकडे सोपवण्यात आली होती. मात्र, तो आजारी असल्याने या सामन्यात खेळू शकलेला नाही. त्याच्याजागी संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी रजत पाटीदारकडे सोपवण्यात आली आहे. ही जबाबदारी योग्यरित्या पार पाडून त्याने पहिल्याच डावात दमदार शतक झळकावलं आहे. सेंट्रल झोन संघाचा सामना नॉर्थ इस्ट झोन संघाविरूद्ध सुरू आहे. पहिल्या डावात फलंदाजीसाठी आलेल्या सेंट्रल झोन संघाला सुरूवातीलाच पहिला मोठा धक्का बसला. त्यावेळी संघाची धावसंख्या केवळ ४ होती.

त्यानंतर चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करण्यासाठी आलेल्या रजत पाटीदारने दमदार फलंदाजी केली आणि शतक पूर्ण केलं. त्याच्या आधी तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीसाठी आलेल्या दानिश मालेवारने आधी शतक पूर्ण केलं. रजत पाटीदारच्या या खेळीचं वैशिष्ट्ये म्हणजे, त्याने कसोटी क्रिकेटमध्येही वनडे स्टाईल आक्रमक फलंदाजी केली. ज्यावेळी तो १११ धावांवर फलंदाजी करत होता. त्यावेळी त्याने अवघे ८५ चेंडू खेळून काढले होते. यादरम्यान त्याने २० चौकार आणि २ षटकार मारले होते.यादरम्यान त्याने १३० च्या स्ट्राईक रेटने धावा केल्या. कसोटी क्रिकेटमध्ये खूप कमी फलंदाज आहेत, जे या स्ट्राईक रेटने फलंदाजी करतात.रजत पाटीदारला भारतीय संघासाठी ३ कसोटी आणि १ वनडे सामना खेळण्याची संधी मिळाली आहे. मात्र, तो वनडे आणि कसोटी संघातून बाहेर आहे. भारतासाठी खेळताना त्याने ३ कसोटी सामन्यांमध्ये ६३ धावा केल्या आहेत. तर वनडे सामन्यात त्याला २२ धावा करता आल्या आहेत.

### कसोटीध्येही वनडे स्टाईल

या स्पर्धेसाठी सेंट्रल झोन संघाची जबाबदारी ध्रुव जुरेलकडे सोपवण्यात आली होती. मात्र, तो आजारी असल्याने या सामन्यात खेळू शकलेला नाही. त्याच्याजागी संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी रजत पाटीदारकडे सोपवण्यात आली आहे. ही जबाबदारी योग्यरित्या पार पाडून त्याने पहिल्याच डावात दमदार शतक झळकावलं आहे. सेंट्रल झोन संघाचा सामना नॉर्थ इस्ट झोन संघाविरूद्ध सुरू आहे.

# माझ्या निवृत्तीमुळे कोणाचं आयुष्य सुधारणार

## निवृत्तीच्या प्रश्नावर वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी संतापला

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघातील डावखुऱ्या हाताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी सध्या भारतीय संघात स्थान मिळवण्यासाठी संघर्ष करताना दिसून येत आहे. त्याला आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेत शेवटची संधी दिली गेली होती. त्यानंतर इंग्लंड आणि आशिया चषकासाठी त्याला संघात स्थान देण्यासाठी विचार सुद्धा करण्यात आलेला नाही. त्यामुळे मोहम्मद शमी निवृत्तीचा निर्णय घेणार का?**




अशी चर्चा रंगायला सुरूवात झाली आहे. दरम्यान या प्रश्नाचं उत्तर देताना मोहम्मद शमी संताप व्यक्त करताना दिसून आला आहे. न्यूज २४ ला दिलेल्या मुलाखतीत शमीने निवृत्तीच्या प्रश्नावर संतापजनक प्रतिक्रिया दिली आहे. तो म्हणाला,"जर कोणाला काही समस्या असेल तर मला थेट सांगा. माझ्या निवृत्तीमुळे त्यांच्या आयुष्यात काही सुधारणा होत असतील, तर तेही स्पष्ट करा. मी कुणाच्या आयुष्यात अडथळा ठरलो आहे का, की मला निवृत्त व्हावं अशी अपेक्षा ठेवली जाते? ज्या दिवशी मला खेळाचा कंटाळा येईल, त्या दिवशी मी स्वतःहून निवृत्ती घेईन. तुम्ही मला संघात घेत नाही, तरीही मी मेहनत थांबवणार नाही. कुठे ना कुठे मी खेळतच राहणार. निवृत्तीचा निर्णय तुम्ही नाही, तर मीच घेईन आणि तोही तेव्हाच, जेव्हा मला खरंच कंटाळा येईल. पण ती वेळ अजून आलेली नाही."मोहम्मद शमीने आयसीसी वनडे वर्ल्डकप २०२३ स्पर्धेत भारतीय संघाला अंतिम फेरीत पोहोचवण्यात मोलाची भूमिका बजावली होती. तो या स्पर्धेतील सर्वात कमी सामने खेळून सर्वाधिक गडी बाद करणारा गोलंदाज ठरला होता. स्पर्धेनंतर दुखापतीमुळे त्याला स्पर्धेतून बाहेर पडावं लागलं होतं.

### मला अस्वस्थता जाणवत होती

दुखापतग्रस्त असूनही त्याने भारतीय संघासाठी पूर्ण जोर लावला होता.दुखापतग्रस्त असल्यामुळे त्याची ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी निवड केली गेली नव्हती. आपल्या दुखापतीबाबत बोलताना शमी म्हणाला,"ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या वेळीही मला त्रास जाणवला होता. मी प्रवास करण्यासाठी तयार होता, पण मला अस्वस्थता जाणवत होती.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

। शुक्रवार ।

। दि. 29 ऑगस्ट 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टचा प्रबोधनात्मक देखावा

## शिक्षण विश्व: विद्यार्थ्यांच्या सृजनात्मक कलागुणांना संधी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**पर्यावरणपूरक उत्सवाबरोबरच जनजागृतीचा संदेश देणारा "मोबाईल व्यसनमुक्ती" हा देखावा इंदापूर येथील शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट येथे गणेशोत्सवात सादर करण्यात आला आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे समाजात निर्माण होत असलेल्या समस्यांबाबत जनजागृती करणे हा यामागील मुख्य उद्देश आहे.**

यासाठी गणेश मूर्तीसमोर मोबाईल व्यसनमुक्ती संदर्भातील देखावे ठेवले आहेत. तसेच मोबाईल व्यसनमुक्तीवर आधारित विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. या माध्यमातून समाजात जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. संस्थेच्या अध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव डॉ. गिरीश देसाई, खजिनदार तुषार रंजनकर, विश्वस्त अरविंद गारटकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा देखावा सादर करण्यात आला आहे.

यावर्षी उत्सवासाठी मूर्ती ही वर्तमानपत्रांच्या लगद्यापासून संस्थेच्या जावेद हबीब अकॅडमी विभागातील विद्यार्थ्यांनी बनवली आहे. मूर्तीची सजावट करण्यासाठी प्लॅस्टिक न वापरता विविध प्रकारच्या कागदांचा वापर केला आहे. "श्रीं"च्या मूर्तीचे वस्त्र फॅशन डिझाइन विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केले आहे.

बुधवारी, (दि.२७ संस्थेच्या कार्यालयात गणेश मूर्तीची स्थापना करण्यात आली. यावेळी ट्रस्टचे विश्वस्त अरविंद गारटकर, आरोग्य केंद्र प्रमुख महादेव चव्हाण, कोपिवरची शाळा प्रमुख भारत बोराटे, सामाजिक कार्यकर्ते हमीद अत्तार आदी उपस्थित होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे कौतुक केले.

यावेळी ट्रस्टचे व्यवस्थापक दिपक जगताप, प्रकल्प अधिकारी सागर कांबळे, जावेद हबीब विभाग प्रमुख अमोल राऊत, फॅशन डिझाइन विभाग प्रमुख त्रिशला पाटील, ब्युटी विभागाच्या रोहिणी जाधव, भारत माने उपस्थित होते. श्रद्धा पवार, आदिती पवार, पुनम गवळी, सुरज जाधव, विजय दळवी, प्रीतम करगळ, विजय गोरे, आदित्य वाघमारे, जॅस्मिन बडकर, पवन नामदास, सपना गायकवाड, शितल राठोड, अथर्व सरोदे, समिक्षा कवितगे, वैष्णवी गुणवरे, जिनत सय्यद,सिंधू जाधव, साक्षी यादव, मंदा ढावरे , आरती कुंभार, अश्विनी बाबर या विद्यार्थ्यांनी देखावा सजावट करण्यात सहभाग घेतला.

# पारंपरिक वाद्यांच्या गजरात विद्यार्थ्यांनी केले बाप्पांचे स्वागत!

## शिक्षण विश्व: न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये गणेशोत्सव उत्साहात साजरा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**थेरगाव येथील नामवंत न्यू इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये श्री गणेशाची प्रतिष्ठापना पारंपरिक वाद्यांच्या गजरात व विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागात मोठ्या थाटामाटात पार पडली. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये हिंदू संस्कृतीची जाणीव निर्माण करणारे उपक्रम परिसरात आदर्शवत ठरत आहेत.**



या विशेष प्रसंगी ढोल-ताशा आणि लेझीम पथकाच्या तालावर पारंपरिक पोशाखात सजलेल्या विद्यार्थ्यांनी भव्य मिरवणूक काढली. उत्साही गजरात श्री गणेशाची मूर्ती शाळेत आणून शाडू मातीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष विजय पवार ,उपाध्यक्ष निलेश पलघोमल यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. प्रतिष्ठापनेनंतर गणेश आरती झाल. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी शाळेत दरवर्षी शाडू मातीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली जाते हे या संस्थेचे वैशिष्ट्य आहे.

मुख्याध्यापिका विद्या नाईक , विजयकुमार माने, यशवंत माने, रुपेश गोरे, वैभव हडप, जयेश लखन, रूपाली माने, निखत अन्सारी तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उस्फूर्त सहभाग नोंदवला.

# विद्यार्थ्यांकडून गणेशोत्सवात सायबर सुरक्षेचे संदेश

## शिक्षण विश्व: प्रतिभा महाविद्यालयातील कौतुकास्पद उपक्रम

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांमुळे सायबर सुरक्षिततेविषयी जनजागृती करणे आजच्या काळातील अत्यंत गरजेचे बनले आहे. हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीजतर्फे क्विक हील फाउंडेशनच्या "सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा" उपक्रमाच्या माध्यमातून सायबर जनजागृती अभियान राबवले जात आहे. या उपक्रमाचे नेतृत्व सायबर जनजागृती अभियान संस्थेचे सचिव डॉ. दीपक शहा यांच्या पुढाकाराने करण्यात येत आहे.**



या अभियानात प्रतिभा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गणपतीच्या सजावटीच्या माध्यमातून सायबर सुरक्षेचे विविध संदेश दिले आहेत. हार, दुर्वा, तोरण, गीता अशा पारंपरिक सजावटीच्या वस्तूंमध्ये सायबर सुरक्षेचे महत्त्व सांगणारे संदेश समाविष्ट करण्यात आले आहेत.

या उपक्रमात ओटीपी शेअरिंग टाळा, अनोळखी लिंकवर क्लिक करू नका, संशयास्पद कॉल आणि ईमेलपासून सावध रहा अशा स्वरूपाची माहिती देण्यात येत आहे. सायबर सुरक्षेबाबत सामान्य नागरिकांमध्ये सजगता निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे

या जनजागृती मोहिमेचे प्रकल्प समन्वयन डॉ हर्षिता वाच्छानी करीत आहेत. क्विक हील फाउंडेशनकडून सीएसआर एक्झिक्युटिव्ह अजय शिर्के, गायत्री केसकर आणि दिपू सिंह मार्गदर्शन करत आहेत. विद्यार्थ्यांमध्ये प्रेसिडेंट श्रावणी सावंत, सेक्रेटरी आकाश ठाकूर, ॲक्टिव्हिटी डायरेक्टर ऑलिव वर्गीस आणि मीडिया डायरेक्टर मानसी वाडेकर हे क्लब ऑफिसर्स म्हणून कार्यरत आहेत.

या उपक्रमात संस्कृती, ओम, अनुष्का, राजीव, पियुषा, मयांक, रिषभ, जाईल, बेंजामिन, सिमरन, रोनित, दुर्वा, गायत्री, फैसल, स्नेहा आणि साकिब हे विद्यार्थी सायबर वॉरियर्स म्हणून सक्रिय सहभाग घेत आहेत.

# ढोल ताशाच्या गजरात विद्यार्थ्यांनी केले बाप्पांचे स्वागत!

## शिक्षण विश्व : एस पी जी इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये गणेश चतुर्थी उत्साहात साजरी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एस पी जी इंटरनॅशनल पब्लिक स्कूल आणि ज्युनियर कॉलेज येथे गणेश चतुर्थीचा पावन सोहळा अत्यंत भक्तिभावात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. ढोल आणि ताशांच्या गजरात पारंपरिक पद्धतीने व गणेश वंदनेच्या सूरात ही स्थापना झाली.**



कार्यक्रमासाठी संस्थेचे पांडुरंग नाना गवळी, स्वप्नील गवळी, संकल्प गवळी, नितीन लोणारी यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक प्रवीण गायकवाड, शिक्षकवृंद आणि सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गणेश चतुर्थीनिमित्त शाळेच्या प्रांगणात सर्वप्रथम गणपती बाप्पाची स्थापना करण्यात आली. ढोल आणि ताशांच्या गजरात पारंपरिक पद्धतीने व गणेश वंदनेच्या सूरात ही स्थापना झाली. उपस्थितांनी एकत्र येत गणेशाची आरती केली आणि वातावरण भक्तिमय झाले.

या वेळी इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य सादर केले. त्यांच्या सादरीकरणाने सर्वांचे लक्ष वेधले. त्यानंतर गणेश चतुर्थीच्या महत्त्वावर आधारित माहितीपर सादरीकरण करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना आपल्या परंपरा आणि संस्कृतीची जाण करून देण्याचा प्रयत्न केला गेला.

कार्यक्रमाच्या समाप्तीनंतर सर्वांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांची बीजे रोवली गेली.

कार्यक्रमाची संपूर्ण रूपरेषा विद्यार्थ्यांच्या सहभागातून व शिक्षकांच्या मार्गदर्शनातून साकारण्यात आली. गणेश चतुर्थीचा हा उत्सव केवळ एक धार्मिक विधी न राहता विद्यार्थ्यांना एकत्र आणणारा, संस्कृतीचे भान देणारा आणि आनंद निर्माण करणारा पर्व ठरला.

# भगवद्गीतेतून विद्यार्थ्यांमध्ये मूल्यांची पेरणी!

## विनायक भोंगाळे : गायत्री इंग्लिश मिडीयम येथे आंतरशालेय भगवद्गीता पाठांतर स्पर्धा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भगवद्गीतेमध्ये जीवनाचे सार सामावलेले आहेत. सामाजिक जडणघडण करताना विद्यार्थी केंद्रबिंदू मानून भगवद्गीता विद्यार्थ्यांमध्ये शालेय जीवनापासून रुजवल्यास चांगल्या आदर्शवत समाजाची जडणघडण यातून होईल असे मत गायत्री इंग्लिश मीडियम स्कूलचे अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी मांडले.**



गायत्री इंग्लिश मिडीयम स्कूल येथे चिन्मय मिशनच्या वतीने आंतरशालेय भगवद्गीता पाठांतर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी शाळेचे संस्था अध्यक्ष विनायक भोंगाळे बोलत होते. भोंगाळे यांच्या पुढाकारातूनच ही स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये अध्यात्मिक विचारांबरोबरच समाज मूल्यांची रुजवणूक व्हावी या उद्देशाने स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेमुळे शाळेमध्ये भगवद्गीतेच्या ओव्यांनी भारलेले, शांत व सात्विक असे वातावरण निर्माण झाले होते. एकूण २०० विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते. त्यांनी भगवद्गीतेतील विविध अध्यायांचे पठण करीत आत्मिक समाधान प्राप्त केले. विद्यार्थ्यांना गीतेच्या अध्यायांची माहिती मिळावी व त्यातून जीवनमूल्यांची जाणीव व्हावी, असा या उपक्रमाचा हेतू होता. स्पर्धेसाठी परीक्षण राजश्री पुरंदरे, दीपा देशपांडे, माधुरी आल्हाट, तनिष्क अल्हाट आणि सायली संत यांनी केले. परीक्षकांनी विद्यार्थ्यांना भगवद्गीतेतील शिकवणी दैनंदिन जीवनात कशी अमलात आणावी याविषयी मार्गदर्शन केले. जीवनात येणाऱ्या अडचणींना सामोरे जाताना गीतेतील तत्वज्ञान कसे उपयोगी पडते, याचा उहापोहही त्यांनी केला.

या प्रसंगी व्यवस्थापकीय संचालिका कविता कडू पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली भागवत, विपणन अधिकारी शैलेंद्र सिंग, मुख्याध्यापक जोतिबा सुरवसे, उपमुख्याध्यापिका प्रिया नेवाळे, तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये भगवद्गीतेबद्दल आदर व आत्मियता निर्माण झाली असून, अशा उपक्रमांनी त्यांचा सर्वांगीण विकास घडून येतो, असे प्रतिपादन उपस्थितांनी व्यक्त केले.

# लक्षवेध स्पोर्ट्स फाउंडेशनतर्फे मंगळागौर उत्सव उत्साहात संपन्न

## शेकडो महिलांनी लुटला मंगळागौरचा आनंद!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मोशी येथील रामकृष्ण लॉन्स येथे लक्षवेध स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने भव्य मंगळागौर उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादीच्या महिला अध्यक्ष कविता आल्हाट यांनी केले होते. महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.**




कार्यक्रमात महिलांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून नृत्य, गायन, हास्यखेळ आणि पारंपरिक मंगळागौरीचे खेळ सादर केले. महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेशही या निमित्ताने देण्यात आला. विविध कलागुणांमध्ये सहभागी झालेल्या महिलांना पैठणी, आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

खासदार सुनील तटकरे, महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर, माजी आमदार विलास लांडे, माजी स्थायी समिती अध्यक्ष अजित गव्हाणे, माजी विरोधी पक्षनेते नाना काटे, तसेच प्रिया बनसोडे, माजी नगरसेवक वसंत बोराटे, गणेश सस्ते, संदेश अल्हाट, आतिष बारणे, निलेश जाधव, विशाल जाधव, प्रकाश गव्हाणे, संतोष सस्ते आदींच्या उपस्थितीने कार्यक्रमाची शोभा वाढली. मराठी सिने कलावंत वैभव तत्त्ववादी, प्राजक्ता गायकवाड आणि ओम यादव हे कलाकार कार्यक्रमाचे विशेष आकर्षण होते. त्यांनी आपल्या उपस्थितीने कार्यक्रमाला आणखी रंगत दिली. मोठ्या संख्येने महिलांनी या उत्सवात सहभागी होऊन पारंपरिक संस्कृतीचे जतन व आनंदोत्सव साजरा केला.

## College of Pharmacy
## Saswad, Pune - 412301
### D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

**Your Trusted Facilitation Centre!**

**FC Code 6372**

Important Note:

- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

## "Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad